**नियमीत दिवाणी दावा क्र.४०८/२०१९**

**शरणम्मा वि. जयश्री**

**नि.क्र.७२**

**प्रतिवादीतर्फे सा.क्र. ०१ यांचा शपथेवर सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.ए.एम.डोंगरे यांच्यातर्फे सुरू:-**

वडीलांच्या मृत्यु पश्चात माझी बहीण भाग्यश्री हिने वारसप्रमाणपत्र काढलेले होते. त्याची प्रमाणीत प्रत ४९१/२०१६ या केसच्या कामी मी दाखल केली आहे . मला दाखविली तिच असून तिला निशाण **७६** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**प्रतिवादीतर्फे सा.क्र. ०१ यांचा शपथेवर उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.देशमुख यांच्यातर्फे सुरू:-**

माझे शिक्षण एस.एस.सी.डी.एड पर्यत झाले आहे. मी शाळेवर शिक्षका आहे. माझा व्यवसाय शिक्षका असलयाचे पुराव्या प्रतिज्ञापत्रात नमुद नाही. माझे वडीलांचे नाव बंडप्पा रेवण सिध्दप्पा देवर्षे स्वामी आहे. बंडप्पा यांना त्यांच्या वडीलाकडून घर मिळकत मिळालेली होती. बंडप्पा यांना एकूण तिन भाउ होते. त्यांची नावे संगण बसप्पा, त्यानंतर माझे वडील बंडप्पा, त्याच्या नंतर कोण भाउ होता त्याचे नाव मला आठवत नाही. साक्षीदार पुन्हा सांगतात कि वडील धरुन तिन भाउ होते. संगन बसप्पा यांना त्यांच्या वडीलांकडून घर मिळकत मिळालेली होती. वडीलापार्जीत घर संगन बसप्पा व बंडप्पा यांच्यात वाटले गेले. बांधलेले घर हे चुलत्याच्या वाटणीला गेले व

दोन तीन खोल्या माझे वडीलाच्या हिस्साला आली व मोकळी जागा मिळाली व त्यावर वडीलांनी बांधकाम केले. आजोबाने बांधलेले घर चुलत्याने घेतले. त्यामुळे बंडप्पाला मोकळी जागा व दोन तीन खोल्या मिळाल्या. शरणामाने बांधलेले घर ज्याच्या हिस्साला जाईल त्याने कुंटुंबावर झाले तीन हजार कर्ज फेडायचे अशी अट ठेवून वाटणी केली होती कि काय हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, बंडप्पाची तीन हजार फेडण्याची ऐपत नव्हती म्हणून त्याने मोकळा प्लॉट घेतला. बंडप्पा व त्यांच्या भावा दरम्यान १९६६ साली वाटप झाले. हे म्हणणे बरोबर आहे की, जो प्लॉट मिळाला त्यामध्ये दलदल होती. १९६९ चा माझा जन्म आहे. माझे आईचे लग्न कधी झाले हे मला माहित नाही. माझे आई–वडीलाचे लग्न माझे जन्मापूर्वी कधी झाले हे मी सांगू शकत नाही.

माझे जन्मापूर्वी आई वडीलाने आय.टी.आयच्या पाठीमागे जमीन विकत घेतली होती. माझे आई वडीलाने आय.टी.आय मागे जमीन घेतली होती तिचे कागदपत्रे मी दाखल करु शकतो. ति जमीन आईच्या नावे खरेदी करण्यात आलेली आहे. त्या जमीनीचे क्षेत्र ५ एक्कर आहे. बंडप्पाचे शिक्षण दहावी इयत्ता पर्यत होते. बंडप्पाचे शिख्ण दहावी पर्यंत झाले याबाबत सरव्हीस बुकला नोंद आहे. बंडप्पा नोकरीला कधी लागले हे मला माहित

नाही. बंडप्पाने पोस्टल डी.एड केलेले त्याचा दाखला मी दाखल केला नाही. बंडप्पा दहावी पास झाले. त्याने पोस्टल डी.एड केले मी तसे कागदपत्र दाखल करु शकते. बंडप्पा यांचा ७०-८० रुपये पासून पगार चालू झाला. त्यांना कोणत्या वर्षी पगार होता हे मी सांगू शकत नाही. शरणम्मा पण नोकरी करायच्या. शरणम्मा यांनी दहावी नंतर डी.एड केले. शरणम्मा १९६५ साली शिक्षक म्हणून नोकरीला लागला कि काय हे मला माहित नाही. हे म्हणणे बरोबर आहे की बंडप्पा हे प्रशीक्षीत शिक्षक नसल्याने त्यांना पगार कमी होता. शरणामा हे प्रशिक्षीत शिक्षका असल्याने त्यांना पगार जास्त होता. आय.टी.आय मागील जमीन शरणामाने तिच्या पगारातून घेतलेले आहे.

षणमुखानंद नागोरे व अशोक मठपती यांना मी ओळखते. षणमुखानंद नागोरे यांचे वडील हे त्यावेळी आमच्या घराजवळ राहायचे. अशोक मठपती हा माझे आत्याचा मुलगा होय. हे म्हणणे खरे नाही की बंडप्पाने जमीन घेतली त्यावर अशोक मठपती साक्षीदार होते. शरणामा व भावाचया विरुदध वाटपाचा दावा दाखल केला होता. त्याचा स्पेशल सुट क्रमांक १/२०२१ होय. मी वडीलाचे घर, वडीलानी आइच्या नावे केलेली जमीन, आईने तिच्या जमीनी घेतलेल्या मध्ये वाटप मागीतले होते. माझा अंशतः दावा मंजूर केला. त्या दाव्यामध्ये मला घर मिळकतीमध्ये हिस्सा मिळाला. १९९३ साली माझे

<u>नियमीत दिवाणी दावा क्र.४०८/२०१९</u>

<u>शरणम्मा वि. जयश्री</u>

<u>नि.क्र.७२</u>

वडीलांचा अपघात झाला होता. दोन वर्ष ते जाग्यावरुन हालू फिरु शकत नव्हते. त्यांचा उपचार लातूर येथील विवेकानंद हॉस्पीटल येथे करण्यात आला. वडीलांच्या आजारपणासाठी आईने ६००००/–रुपये कर्ज केले होते कि काय हे तिलाच माहिती. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामुळे बंडप्पा खचले होते. हे म्हणणे खरे नाही की, चार–पाच वर्ष बंडप्पा काही काम करु शकत नव्हते. अपघातामुळे बंडप्पा तीन वर्ष नोकरीच्या ठिकाणी गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, बंडप्पा आजारी असल्याने आईने त्यांच्या नावावर जमीन क्रं. ३४/ब/२ हि खरेदी केली. बंडप्पा हे १९८६ साली सेवा निवृत्त झाले. बंडप्पाच्या नावावर १९८६ साली जमीन खरेदी केली. बंडप्पा पेन्शन मिळाला लागली त्यातूनच शेतजमीन घेतली मी तारीख सांगू शकत नाही. बंडप्पाला १९८६ पेन्शन मंजूर झाली त्याचे कागदपत्रे मी दाखल करु शकते.

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

**Sd/–**

**( श्री. व्ही. आर. घराळ )**

**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**उदगीर.**

**ठिकाणः उदगीर**

**दिनांकः– ०६/०२/२०२६**